



# जात्यावरच्या ओव्या......

जाऊन माहेरा
गोड बोलून परताव
घरची तुळस, कधी
सुकुन ना जाव ॥३८५॥

जाऊन माहेरा
बोल चुलत्या-पुतण्याला
आंब्या फुटला मोहोर
एक नाही फुल त्याला ॥३८६॥


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# माती भिडली आभाळा...




ज्योतिर्मय साहित्य

पण माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितल्यानंतर साधारणपणे तेरा ते एकोणिसाव्या शतकापर्यंत हे अत्यंत पवित्र असे स्थान विपन्नावस्थेत होते. संत ज्ञानेश्वरांची कर्मभूमी असलेले हे स्थान ! या स्थानाची लोकांना विस्मृती झाली होती. या स्थानाला उर्जितावस्थेत आणण्यासाठी एखाद्या समर्पित त्यागी साधकाची आवश्यकता होती. आज हे स्थान आपल्याला आपल्याला ऐश्वर्यसंपन्न भासते त्यामागे वारकरी संप्रदायाचे महान उपासक वै. सोनोपंत दांडेकर मामांचे शिष्य ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांचे मोठे योगदान आहे.





पैठणहून आळंदीला जाताना ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताबाईंनी या ठिकाणी काही दिवस मुक्काम केला. असे म्हणतात की पैठणला ज्या रेड्याकडून ज्ञानेश्वर माऊलींनी वेद वदवून घेतले, तो रेडा देखील या ठिकाणी त्यांच्या सोबत होता. इथेच निवृत्तीनाथांनी ज्ञानोबा माऊलींना ज्ञानेश्वरी लिहिण्याची आज्ञा दिली. इथेच त्यांना तसे का वाटावं ? तर या स्थानाचा महिमाच तसा होता. या ठिकाणी साक्षात श्री विष्णूंनी मोहिनीरूपात दहा दिवस निवास केला होता. त्यांनी निवास केला म्हणून हे नेवासे असे म्हटले जाते. त्या मोहिनीराजांचं सुंदर हेमाडपंती मंदिर इथे आहे.

समुद्रमंथनातून जेव्हा चौदा रत्ने बाहेर पडली, तेव्हा त्यात अमृताचा कलश हाती घेऊन धन्वंतरी प्रकट झाले. अमृत हे अमरत्व प्रदान करणारे होते. म्हणून देव आणि दानव यांच्यात अमृत वाटपावरून भांडणे सुरु झाली. त्यात भगवान विष्णूंनी मोहिनीरूप धारण करून देवांना अमृत आणि दानवांना सुरा म्हणजे मदिरा वाटप केली. हे राहू आणि केतूच्या लक्षात आले. राहू अमृत प्राशन करण्यासाठी आपले रूप बदलून देवांमध्ये जाऊन बसला. श्री विष्णूंच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी आपल्या सुदर्शन चक्राच्या साहाय्याने राहुचा शिरच्छेद केला. त्याचे शीर उडून ज्या ठिकाणी पडले त्या गावाला राहुरी असे नाव प्राप्त झाले तर त्याचा देह म्हणजे काया ज्या ठिकाणी पडली, ते कायगाव म्हणून प्रसिद्ध झाले अशी दंतकथा आहे.

तात्पर्य हे इतके पवित्र ठिकाण आहे. इथे एकदा श्री विष्णूंनी अमृत वाटप केले. दुसऱ्यांदा ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या रूपात साऱ्या जगाला अमृत प्रदान केले. ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी सारस्वताचे सौभाग्यलेणे. काव्य आणि तत्वज्ञान यांचा सुरेख संगम. यानंतर त्याठिकाणी अमृतासमान अनुभव देणारा अमृतानुभव हा ग्रंथ ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिला. ज्या प्रवरा नदीच्या काठावर हे तीर्थक्षेत्र वसले आहे, त्या प्रेवरेला अमृतवाहिनी असे संबोधले जाते. येथून जवळच गोदावरी आणि प्रवरेचा संगम आहे. या संगमावर देवगड हे पवित्र स्थान आहे. जवळच शनी शिंगणापूर आहे. असा हा रम्य आणि पवित्र परिसर. या पवित्र, शांत आणि रम्य स्थळी खरोखरच वेळ काढून जायलाच हवं.

(क्रमशः)






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# द्रुष्यनिरसन

ज्योतिर्मय साहित्य

दशक ६ समास ८

नमस्कार

परमेश्वराने माणसाची निर्मिती करताना माणसाच्या इंद्रियांच्या रचना एक सारख्या केल्या आहेत. तिथे त्याने दुजाभाव केलेला नाही. ऊदा, नाकाचा उपयोग श्वास घेण्यासाठी, कानाचा उपयोग ऐकण्यासाठी तसेच शरीरांतर्गत असलेल्या प्रत्येक अवयवांचा उपयोग एकसारखा होतो. हे आपल्याला माहिती आहे. असं कुणीही म्हणणार नाही की मी शरीरातील उष्णता कमी जास्त करू शकतो. तसं होत नाही कारण ईश्वराने सर्वांना समान शरीर रचना दिलेली आहे.


माणसाचे मन अर्थ समजते. पण मनाचे रूप जसे बदलत जाते तसा त्याच वस्तुचा अर्थ समजण्यास फरक पडतो. उदा,लहान बालकाला आईचा अर्थ कळतो. वयात आलेल्या मुलीला आईसमजते.पण जेव्हा ती मुलगी स्वतः जबाबदार आई होते तेव्हापासून तिच्या आईपणाचा निराळाच अर्थ समजतो.मनाचे स्वरूप जर संपूर्ण बदलून टाकले तर वस्तूचा नवा अर्थ समजतो मगया नव्या अर्थाच्या द्रुष्टीने जुना अर्थ खोटा भ्रम किंवा भास होता असे वाटते. संत कुणाला म्हणायचे?

तर जो पुरूष साधनाने आपली मनोरचना अमुलाग्र बदलून टाकतौ तो संत होय.जगातील प्रत्येक व्यवस्थेवर जसा आपला विश्वास असतो तसाच तो विश्वास संतांचा पण असतो. पंचमहाभूतांचे द्रुष्य विश्व आपल्याला सर्वस्वी खरे वाटते ते संतांना मिथ्या वाटते. खरें पणाचा केवळ भास आहे असे वाटते. एकदा का तुम्ही संतसंगतीची कास धरली की जीवाची अविद्या कमी कमी होत जाते. ती कमी झाली की सामान्य माणसाच्या विचारात बदल होतो.अविद्येने भरलेल्या मनाच्या नर्मळपणा या द्रुष्याने नाहीसा होतो. वाल्याचा वाल्मिकी झाला हे आपल्याला माहिती आहे.

पाण्यावर अनेक बुडबुडे उठतात प्रत्येक बुडबुड्यात प्रतिबिंब दिसते. बुडबुडे लगेच फुटतात त्यामुळे ती मिथ्या रूपी बुडबुडे पण फुटले म्हणून ही रूपे मिथ्या समजुीत. द्र्युष्य मिथ्या असुन दिसते. जड,मूढ अज्ञानी जीव यांना अनुभव येतो व संत,महंत,ज्ञानी पुरूषांना अनुभव येतो . संतांचा अनुभव श्रेष्ठ होय.

(क्रमशः)

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




ज्योतिर्मय साहित्य

कुलकर्णी पण मिळालेल्या माणसाने गावातील शेतसारा गोळा करण्या बरोबर सर्व लोकांची काळजी घेणे हे काम त्या काळी होते. सिध्दोपंतांनी हे कुलकर्णी पण अत्यंत सात्विक वृत्ति ने सावधतेने पार पाडले आणि म्हणून तर जगाला माऊलींची

ओळख झाली असे मानले तर ते खोटे होणार नाही.

गावात आलेल्या अतिथीला

सिध्देश्वर पंतांनी आपल्या घरी आणले. त्यांचा यथोचित सन्मान केला.

कारण हा कोणी साधासुधा माणूस नाही हे त्यांच्या चाणाक्ष नजरेने ओळखले होते.

असेचं दिवस जात होते एक दिवस सिध्दोपंतांच्या मनात आले आपली लाडकी लेक रूक्मिणी या विठ्ठलपंतना दिली तर ! आपल्या लेकीचे पाणी ग्रहण करण्याची विनंती त्यांनी विठ्ठलपंतांना केली. योग्य मुहूर्त पाहून हा विवाह सोहळा श्रीक्षेत्र आळंदी येथे संपन्न झाला. नंतर ते शास्त्राभ्यास करण्यासाठी परत घराबाहेर पडले तेव्हा दक्षिण भारत ते ऊत्तर भारत असा प्रवास करून ते परत आळंदीस आले. व आपल्या मातापित्यांच्या भेटीसाठी आपेगावास जाण्यासाठी निघाले. तेव्हा त्यांच्या बरोबर रूक्मिणी बाई व सिध्दोपंत बरोबर होते. गोविंद पंत व निरा बाईने आपल्या मुलाला व सुनेला **चिरंजीव नांदा**असा आशीर्वाद दिला.मातापित्यांचा सहवास फार काळ त्यांना लाभला नाही. दोघेही वैकुंठवासी झाले. आता संसाराचा भार विठ्ठलपंतांवर पडला पण त्यांचे संसारात लक्ष नव्हते.

परत ते विद्याभ्यासासाठी काशी क्षेत्रात आले. तिथे श्रीपाद स्वामींचा उपदेश घेऊन त्यांच्याकडून संन्यास दिक्षा घेतली. त्यांनी विठ्ठलपंताचे नाव चैतन्य ठेवले

श्रीपाद स्वामींच्या आश्रमाचे नाव होते चैतन्याश्रम

विठ्ठलपंत तिथे राहून वेदवेदांगाचे अतिशय अवघड शिक्षण काशी क्षेत्रात करत होते.

काय योगायोग आहे पहा ईकडे श्रीपादस्वामी तिर्थाटन करत करत आळंदी क्षेत्रात आले तिथे त्यांना एक माता भगिनी कडकडीत व्रत आचरण करत अश्वत्थास प्रदक्षणा घालत असलेली दिसली. कर्मधर्मसंयोगाने श्रीपादस्वामींना तिने नमस्कार केला व पुत्रवती भव असा आशीर्वाद दिला.

या आशीर्वादाने रूक्मिणी बाई गोंधळल्या, डोळ्यातुन अश्रुधारा वाहू लागल्या मन पति देवाच्या विरहाने व्याकूळ झाले. श्रीपाद स्वामींनी दुःखी का आहेस माते! असे विचारले असता ? त्यांनी पतीदेव विद्याभ्यास आठी काशी क्षेत्रात आहेत असे सांगितले. विठ्ठलपंतांच्या सर्व खाणाखुणा तंतोतंत जुळल्या व चैतन्यास म्हणजेच विठ्ठल पंतास ओळखले व परत काशीला जाऊन पूर्वाश्रमीच्या विठ्ठलपंतस व आताच्या चैतन्यास ग्रहस्थाश्रम पुरा करण्यासाठी आज्ञा केली.

मंडळी ईथे एक लक्षात येते की विठ्ठलपंतांनी गुरू आज्ञा पाळली खरी !

नंतर त्यांना निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई ही चार मुले झाली. हा काळ साधारण ११९० ते ११९९ बारा बलुतेदारांचा अमंल असलेला तो काळ होता. म्हणजे ब्राह्मण वर्गाने यज्ञयागदी कर्म करावे पूजापाठ करावा, शेतकरी लोहार, सुतार,तांबट असा समाजाच्या विभागणी वर आधारित काळ होता या कर्मप्रधान काळ रचनेचा पायंडा खोलवर रूतलेल्या या काळात समाज मार्तंडांना हे मनी रूजले नाही .या दांपत्याला संन्यस्त असुन मुलेबाळे झाली म्हणून धर्ममार्तंडांनी अक्षरशः वाळीत टाकले.पण नंतर मात्र संसारात चार मुलांचे पिता म्हणून घेताना समाजाच्या रोषाला किती सामोरे जावे लागले की त्यांना देहान्त प्रायश्चित्त घ्यावे लागले.

(क्रमशः)




# दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

ज्योतिर्मय साहित्य

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

खुप काम आहे, असे म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकते. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकता तसेच कार्यक्षमतेवर देखील वाईट परिणाम होऊ शकतो काही व्यक्ती वजन कमी

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

करण्यासाठी जेवण टाळात पण आरोग्यासाठी हे घातक आहे. हे आहेत दुष्परिणाम.

चक्कर येणे.

भुकेले राहिल्याने अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

ताण-तणाव.

भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

लठ्ठपणा वाढतो.

भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केल्यास, वेळी-अवेळी खाल्लास, वजन वाढते, म्हणजे लठ्ठपणा वाढतो... वेळेत जेवण न केल्याने चयापचय प्रक्रिया बिघडते व फॅट्स शरीरात जमा होतात, यामुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. तेव्हा वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तरं, भूक लागेल तेव्हा वेळेवर योग्य-पौष्टिक आहार घ्या आणि किमान २० मिनिटे व्यायाम करा...

मेंदूचे कार्य बिघडते.

ग्लुकोजच्या मदतीने मेंदूचे कार्य सुरू असते. यासाठी योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा रक्तातील साखरेची पातळी खालावते. लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता कमी होते.

चिडचिड.

भुकेमुळे जास्त चिडचिड होते. रक्तातील साखरेची पातळी खालावल्याने मेंदूप्रमाणे तुमच्या मूडवर याचा परिणाम होतो...

***

# ॥ समृद्ध मराठवाडा ॥

माधव सूर्यवंशी,
माकणीकर
(मो. 9527853953)



ज्योतिर्मय साहित्य

मराठवाडा हा शब्द आला की हैद्राबाद मुक्तीसंग्रामातून मुक्त झालेला प्रदेश अशीच ओळख आपणासमोर येते. त्याहीपेक्षा मागे जाऊन पाहीले तर मराठवाडयाची सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक वाटचाल मोठया प्रमाणात आहे. या भूमीला ऐतिहासिक महत्व आहे. इथल्या मातीत अनेक हिरे जन्माला आली आहेत. मराठवाडा ही संताची भूमी असेही म्हटले जाते. मागासलेला मराठवाडा अशी जरी ओळख असेल तर ते मागासलेपण कदाचित इतर प्रदेशांच्या तुलतेन आर्थिक बाबतीत, भौतिक सेवासुविधांच्या बाबतीत, रोजगाराच्या बाबतीत असावे. परंतु कला, साहित्य, शिक्षण, पराक्रम इत्यादी बाबतीत मागासलेपण म्हणता येणार नाही.

नरहर कुरुंदकरांचे एक व्याख्यान ऐकताना असे समजले की ते मराठवाडयातील नांदेड येथील प्राचार्य होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेली भाषणे प्रसिध्द आहेत. वेगवेगळया विषयांची त्यांची हाताळणी अत्यंत प्रभावी आहे. मागास समजल्या जाणाऱ्या मराठवाडयांत अनेक साहित्यीक लाभले. नरहर कुरुंदकर जन्म हिंगोली जिल्हयातील परंतु कर्मभुमी नांदेड परंतु साहित्याच्या प्रचंड उंचीवर असलेला माणूस. त्याव्यतिरिक्त रा रं बोराडे, बाबा भांड, ना.धो. महानोर, इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख, फ.मु. शिंदे, वासुदेव मुलाटे, शेषराव मोरे, असे अनेक लेखक व कवी मराठवाडयाने दिले.

साहित्यलेखनामध्ये मराठवाडयाचा विचार करायचेच झाले तर मराठीचे पहिले अक्षर जरी कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथे सापडल्याची नोंद असली तरीसुध्दा मराठी भाषेतून साहित्य निर्मीती अंबाजोगाई येथील कवी मुकुंदराज यांना जाते. त्यांनी विवेकसिंधु नावाचा ग्रंथ लिहीला.

भाषेची समृध्दी अकराव्या शतकापासून प्रत्ययास येते. कारण महानुभव साहित्य, संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हे लेखन म्हणजे मराठी भाषेचे वैभव आहे. संतांनी मराठी भाषेला साहित्य आणि सांस्कृतिक दर्जा दिला. मराठवाडा भुमीला संतांची मोठी देण लाभली. संत ज्ञानेश्वराचे जन्मगांव आपेगांव ता. पैठण, संत रामदास स्वामीचे जन्मगांव जालना जिल्हयातील जांब समर्थ ता. घनसावंगी, संत नामदेवांचे जन्मगांव नरसी नामदेव ता. हिंगोली, संत एकनाथ महाराजांचे जन्म गांव पैठणे येथे आहे. संत एकनाथ महाराजांचे पणजोबा त्यांनी विजयनगरला नेलेली विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरला परत आणली आणि पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात त्यांची समाधी आहे हे अत्यंत कतृत्ववान व्यक्ती होते. संत एकनाथ महाराज यांचे गुरु संत जनार्धन स्वामी हे देवगिरी किल्ल्याचे किल्लेदार होते. शुलीभंजन हे त्यांचे तप करण्याचे ठिकाण होते. येथेच संत गोरा कुंभार तेर ता. धाराशिव, संत चोखामेळा यांचा जन्म मराठयावाडयाच्या शेजारीच बुलढाणा जिल्हयात मेहुनपुरा येथे झाला, संत जनाबाईचा जन्म परभणी जिल्हयात गंगाखेड येथे झाला. मराठवाडयाच्या संत परंपरेने इथल्या लोकसंस्कृतीची जडणघडण झाली.

(क्रमशः)

# "नाट्यश्री" च्या वाङ्मय पुरस्कारासाठी देश, विदेशातून गडचिरोलीत साहित्यिकांची मांदियाळी

## साहित्य कला मंच तर्फे वाङ्मय पुरस्कार सोहळा व काव्य संमेलन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**गडचिरोली –** नाट्यश्री साहित्य कला मंचच्या वतीने आयोजित महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कार सोहळा तसेच कवी संमेलनासाठी राज्यभरातून तसेच देश विदेशातून साहित्यिकांची मांदीयाळी ७ डिसेंबर रोजी गडचिरोली अवतरली होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते राज्यातील विविध साहित्यिकांना पुरस्कार देण्यात आला. येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात नाट्यश्री कला मंच तर्फे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा तसेच कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य एस.एन. पठाण, तर प्रमुख अतिथी म्हणून झाडीपट्टीतील जेष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ.परशुराम खुणे,ज्येष्ठ रंगकर्मी प्राचार्य डॉ. श्याम मोहरकर, ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक व कवयित्री उषाकिरण आत्राम, ज्येष्ठ रंगकर्मी दिग्दर्शक व आदिवासी साहित्यिक नीलकांत कुलसंगे, नागपूर येथील पत्रकार विनोद देशमुख, झाडीपट्टीतील नाटककार चुडाराम बल्हारपुरे, ज्येष्ठ रंगकर्मी दादा चुधरी आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य एस एन पठाण यांनी आपले अध्यक्षीय भाषणात गडचिरोली येथे अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे आणि संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर देश विदेशातून प्रत्यक्ष विजेते स्पर्धक येथे उपस्थित राहणे ही आमच्यासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे सांगितले. पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आले. चांदा ते बांदा सर्व पुरस्कृत साहित्यिक यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व



अक्षरधन देवून गौरविण्यात आले.

या प्रसंगी चुडाराम बल्हारपुरे संपादित जोडीदार या प्रातिनिधिक कविता संग्रहाचे व अॅड.पी. डी. काटकर लिखीत आमुचा भारत महान, नारी रत्नांची खाण या पुस्तकांचे विमोचन देखील करण्यात आले.

**हे आहेत विजेते –**

कादंबरी विभाग : प्रथम क्र. लेखिका अर्चना देव बुलढाणा, द्वितीय क्र. भ.पु. कालवे संभाजीनगर, तृतीय क्र. डॉ. वसुधा वैद्य नागपूर. कथासंग्रह विभाग : प्रथम. डॉ. सुनील विभुते बार्शी, द्वितीय. प्रमोदकुमार अन्नेराव भंडारा, तृतीय. प्रा. रसूल सोलापूर महागाव कवितासंग्रह गजल संग्रह विभाग : प्रथम– सिराज करीम शिकलगार आंधळी, द्वितीय– गझलकार दिलीप सिताराम पाटील राजुरा, कवितासंग्रह विभागातून प्रथम – डॉ.सुनील श्रीराम पवार मेहकर, द्वितीय – यादव गावडे बऱ्हाणपूर, तृतीय – स्मिता जडे दामाजी नगर, समीक्षा विभाग : यामध्ये प्रथम – रमेश पोफळी पुणे, द्वितीय – डॉ. विनोद राऊत बोरगाव मेघे, तृतीय – प्रा. डॉ. माधव कांडणगिरी संशोधन ग्रंथ पुरस्कार: प्रथम डॉ. अनुराग श्रीकांत लवेकर बंगलोर, द्वितीय – राजीव गजानन पुजारी सांगली, तृतीय – डॉ. दत्ताराम राठोड अमरावती.नाटक विभाग : प्रथम – डॉ. विजयकुमार देशमुख, गोरेगाव पूर्व मुंबई, द्वितीय – राजरत्न पेटकर वरोरा, आत्मचरित्र विभाग : प्रथम – डॉ.राजश्री शिरभाते इंग्लंड युके, द्वितीय – भारत सातपुते लातूर, तृतीय– डॉ. नंदकुमार राऊत नवीन पनवेल,चरित्र ग्रंथ विभाग: प्रथम – सुनील पांडे, द्वितीय – अनिल शेवाळकर, शेवाळा जिल्हा हिंगोली. ललित लेख विभाग : प्रथम – मुग्धा शेखर बोरकर फोंडा गोवा, द्वितीय – डॉ.नरेश नरेंद्र भिकाजी कदम, खारघर मुंबई. वैचारिक लेख : प्रथम – अनिल पाटील अलिबाग जिल्हा रायगड, द्वितीय – सत्यवान मंडलिक वाळवा जिल्हा सांगली. बालसाहित्य विभाग : प्रथम – डॉ. मानसी मंगेश कोळते व डॉ.संजय जानराव ढोबळे, द्वितीय – गणेश शिवराम भाकरे सावनेर. आत्मकथन विभाग : प्रथम – अजित देशमुख सानपाडा नवी मुंबई, द्वितीय – आनंद इंदिरा श्रीधर सांडू चेंबूर मुंबई, तृतीय – सुनील देसाई कोल्हापूर या स्पर्धक विजेत्यांचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश गोहणे यांनी केले.

पुरस्कार वितरणानंतर मेहकर (बुलढाणा) येथील साहित्यिक डॉ. सुनील पवार यांचे अध्यक्षतेखाली व गडचिरोली येथील ज्येष्ठ कवी रामराम करकाडे यांचे उपस्थितीत कवी संमेलनाचे आयोजन सुद्धा करण्यात आलेले होते. यावेळी राज्यातील सर्व भागातून आलेल्या ८० कवींनी या कार्यक्रमात आपल्या कविता सादर केल्या. सर्व कवींना सन्मानपत्र व अक्षरधन भेट देण्यात आले.

कविसमेलनाचे सूत्रसंचालन दिलीप मेश्राम यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी नाट्यश्री साहित्य कला मंचचे डॉ. दिलीप मेश्राम, दादा चुधरी, प्रा. अरुण बुरे, जितेंद्र वासुदेव उपाध्ये,रमेश गंगाधर निखारे, योगेश गोहणे, प्रा. यादव गहाणे, राजेंद्र जरुरकर, हेमंत कावळे, अशोक सुत्रपवार,सुनील चडगुलवार, निरंजन भरडकर, मारोती लाकडे, सौ. कुंदा बल्हारपुरे, चुडाराम बल्हारपुरे आदी कलावंत तसेच नाट्यश्री साहित्य कला मंचच्या सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.




# स्वामी अय्यप्पा मंदिर सबरीमला



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आज आपण केरळमधील एक अत्यंत पवित्र असे देवस्थान, जे दुर्गम पहाडावर वसलेले आहे, त्या अय्यप्पा मंदिर सबरीमला या दिव्य स्थळास भेट देणार आहोत.

शबरी मला हे पथनाम थिटा या केरळ मधील जिल्ह्यात आहे. पर्वतांच्या रांगेने, आणि जंगलानी वेढलेले शबरीमला येथील अय्यप्पा स्वामी मंदिर आहे. हे स्थान त्याच्या गुढत्वा बद्दल आणि अलौकिकत्वा बद्दलही प्रसिद्ध आहे. हे ठिकाण पेरियार टायगर रिझर्व च्या जवळ येते. दरवर्षी या मंदिरात लाखो भक्त भेट देतात.

मंदिरातील मुख्य देवता

या मंदिरातील प्रमुख देवता ही अय्यप्पा स्वामी या नावाने ओळखली जाते. अय्यप्पा हे धर्म रक्षक म्हणूनही गणल्या जातात. शिव आणि मोहिनी रूपातील विष्णू यांच्या मिलनातून अय्यप्पा चा जन्म झाला.

पौराणिक कथा

महेशी नावाची एक राक्षसीन होती. तिचा उपद्रव सर्व जनतेस आणि ऋषी मुनीसही होत असे. तिला असा वर प्राप्त होता की, तिचा मृत्यू केवळ शिव आणि विष्णू यांच्या मिलनातून झालेल्या पुत्राच्या हातून होईल. एवढा दुर्लभ वर प्राप्त झाल्यामुळे ती बेताल झाली. आणि सर्व जनतेस पीडा देऊ लागली.

समुद्रमंथनातून उत्पन्न झालेले अमृत राक्षसांनी पळवून नेले त्यांच्याकडील अमृत कुंभ काढून घेण्यासाठी भगवान विष्णूंना मोहिनी नामक एक अतिशय सुंदर अशा स्त्रीचे रूप घ्यावे लागले. त्या रूपाने राक्षस तर मोहित झालेच, परंतु साक्षात भगवान सदाशिव ही मोहिते झाले.

महेशी या राक्षसीनीला संपविण्यासाठी त्या मोहिनी अवतारातील विष्णू ना महादेवा पासून एक पुत्र झाला. तो अय्यप्पा या नावाने प्रसिद्ध झाला. तो प्रचंड पराक्रमी होता. त्याने महाभयंकर अशा महिशी या राक्षसीनेचा वध केला. भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी अय्यपाने आपला चिरंतन निवास शबरीमला च्या पर्वत शिखरावर ठेवला.

शबरीमला हे नाव पर्वत रांगांना पडण्याचे कारण म्हणजे. इथेच प्रभू श्री राम हे शबरीला भेटले होते. त्याच शबरीच्या नावावरून शबरी मला हे नाव पडले.

**(क्रमशः)**

# लेखन...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




लहानपणी पाटी लेखन देऊन आपल्या लेखनाचा श्रीगणेशा आई–वडील करत असत तर, हे लेखन सुलेखन होण्यासाठी आपले शिक्षक वृंद तीच ती अक्षरे गिरवण्यासाठी सांगत असत तर या लेखनाचा प्रारंभ आपण नकळत्या वयापासूनच सुरू केलेला असतो याच लेखन कौशल्याच्या बाबतीत समर्थ रामदास स्वामींनी आपल्या दासबोध या ग्रंथात लेखन कसे असावे याबद्दल मार्गदर्शन केले आहे.


मग लेखन म्हणजे तरी काय ?

सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर लेखन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून अनेक भावनांची उत्स्फूर्तपणे तर कधी विचारांती केलेली मांडणीच होय. या मांडणीलाच भावभावनांचे अनेक पदर असतात. कधी त्यात सुखाचा धागा विणलेला असतो तर कधी दुःखाची उसवलेली सल असते. कधी आनंदाचे भरते देखील आलेले असते मग कधी नैराश्याचे काळे ढग दाटून आलेले असतात. बऱ्याच वेळा प्रेमाच्या सरीवर सरी बरसलेल्याअसतात थोडक्यात लेखन म्हणजे जीवनात आलेल्या रंगीबेरंगी अनुभवांची गाठोडीच होय. लेखकाने, कवीने, नाटककाराने त्या काळातील साहित्यात त्या त्या काळाचे प्रतिबिंब लेखनाद्वारे वाचकांपुढे मांडलेले असते. मनुष्य स्वभावाप्रमाणे त्या त्या भावनांशी जवळीक असलेले साहित्यचआपल्याला भावते म्हणूनच आपल्या भावभावनांशी सलगी साधायची असेल तर आपण आपल्या आवडीवर प्रेम करून लिहिते झाले पाहिजे अंतःअस्ती प्रारंभ या उक्तीप्रमाणे शेवट हाच सुरुवात आहे असे समजून माझ्या लेखनाला विराम देते.




# जीवन जगताना नवीन दृष्टिकोन देणारे "अमृतवेल"

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**(मागील अंकवरून)**




जगातली कोणतीच स्त्री आपल्या पोटाच्या लेकरांना अशी वर्तणूक देणार नाही जी वर्तणूक देवदत्त यांना त्यांच्या आईकडून मिळाली. अतिशय लाजिरवाण्या गोष्टी यात परिस्थितीपुढे हतबल होऊन स्व अपत्याला व्यसनाच्या व्याधीत लोटणारी ही पहिलीच माता कादंबरीतून अनुभवण्यास मिळाली.

देवदत्त यांच्या दुःखावर फुंकर घालायला वसुला जमलेच नाही. नंदाला फुंकर मार अशी म्हणण्याची गरज पडलीच नाही.

चंदनगड येथे देवदत्त आणि नंदा फिरायला जातात . तिला जाणून घ्यायचे असते. पण तिथे गेल्यास देवदत्त वाघिणीला मारण्यासाठी जातो आणि नंदा रात्रभर राहते . वसू इतका तिचा राग करते की तिला स्वतःची च लाज वाटत होती. तिने केले काही नव्हते पण ती वसूला पटवून सांगू शकत नव्हती.

बापू तिला विचारतात की देवदत्त वर तू प्रेम करतेस का तर ती हो म्हणाली. तेव्हा बापू खाली पाहतात. करुणा युक्त प्रेम फक्त त्यात त्याग होता . काळजी होती आपलेपणा होता. भावनेचा ओलावा होता जो देवदत्तला हवा होता. तो भावनिक रित्या पूर्ण बरा झाला . नंदाच्या सान्निध्यात थोड्या सुसंवादाने तो पूर्ण बरा झाला.


देवदत्त यांचे आत्महत्येचे विचार नंदाच्या मार्गदर्शनाने बदलले. दुःखी लोकांच्या शोधात अनेकांच्या कल्याणात जगण्याचे त्याने कबूल केले .नंदाताई म्हणून पत्र लिहिले.


वसू हिने आत्महत्येचा प्रयत्न केला . तिला वाचविण्यात आले पण ती ला शॉक ट्रीटमेंट देण्यात येणार होती तिला पूर्ण बरी होण्यास सहा महिन्यांचा कालावधी लागणार होता. इतक्या वेळात देवदत्त समाज सेवा करणार होता. कारण नंदा तिथे राहणार होती. तिला विनाकारण बदनामीचे मळभ नको म्हणून त्याने नंदा ताई असे पत्र लिहून पुढील सत्कर्माची हमी दिली. आत्महत्येचा विचार त्याने सोडला हे नंदाला पटले. जीवनाला वेगळाच सकारात्मक दृष्टिकोन देणारी कादंबरी अमृतवेल हृदयात कायमस्वरूपी घर करते.

पुस्तकाचे नाव. अमृतवेल
लेखकाचे नाव. वि. स. खांडेकर
किंमत.१५०
प्रकाशक. मेहता पब्लिशिंग हाऊस
परीक्षण : सौ. जयश्री अर्जुन मुंडे अंबाजोगाई

**पुस्तक परीक्षण**
**सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
**अंबाजोगाई**






# ।। जेथे नाम तेथे माझे प्राण ।।

ज्योतिर्मय साहित्य

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव दि. ५ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत गोंदवले येथे मोठ्या उत्साहाने संपन्न होत आहे. दरवर्षीप्रमाणे कोठीपूजनाने उत्सवाचा शुभारंभ दि ५ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या दहा दिवसाच्या कार्यक्रमात अखंड रामनाम नामजप, विष्णुसहस्रनाम, लघु रुद्र, तसेच दररोज गायन आणि भजन प्रवचनाचे कार्यक्रम संपन्न होत असतात. या वर्षीही राहुल देशपांडे, महेश काळे, संपदा माने कदम, श्रुती सडोलीकर काटकर, आदी मान्यवरांचे गायन तसेच श्रेयस बडवे, मोहकबुवा रायकर, रामदास आचार्य, सुहास देशपांडे, आदी मान्यवरांच भजन पकिर्तन असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. अशा विविध कार्यक्रमांनी आणि नामजपाने गोंदवलेची भूमी दुमदुमून जाते. हजारो ने भावीक या ठिकाणी आपली हजेरी लावतात आणि मोठ्या भक्तीभावाने सहभागी होतात. दुरून दुरून या कार्यक्रमासयेतात. भाविक दहा दिवस येथे मुक्कामी असतात.दहा दिवसांची सेवा मागून घेतात.

मार्गशीर्ष कृष्ण दशमी या दिवशी सकाळी पाच वाजून ५५ मिनिटांनी गुलालाचा कार्यक्रम होतो आणि महाप्रसादा नंतर त्याच दिवशी पुण्यतिथी उत्सवाची सांगता होते. यावर्षी १४ डिसेंबर ०२५ रविवार रोजी हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.


महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे होऊन गेलेल्या श्री ज्ञानेश्वरमहाराज, श्री तुकाराममहाराज, श्री समर्थ रामदास स्वामी व श्री एकनाथ महाराज आदि संताच्या मांदियाळीत शोभून दिसतील, अशा संतांपैकी एक म्हणजे श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर! त्यांची जन्मभूमी म्हणजे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील गोंदवले बुद्रुक हे छोटेसे गाव. पण त्यांच्या जन्माने आणि वास्तव्याने आज महाराष्ट्रातच काय पण साऱ्या भारततही ते पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे.

काय वर्णू आता गोंदवल्याची ख्याती
जेथे प्रगटली चैतन्य मूर्ती....
शांती सुखाचे जणू हे माहेर
अष्ट प्रहर येथे नामाचा गजर
रामनामी पावन झाली इथली माती
जेथे प्रगटली चैतन्य मूर्ती......

असे ज्या गोंदवलेचे वर्णन केले जाते आणि जेथे अखंड

राम नामाचा जप सुरू असतो, भाविकांचा दर्शनासाठी ओघ असतो. अशी ही गोंदवले नगरी म्हणजे संतांची भूमीच आहे.

श्री महाराजांच्या घराण्यात पंढरीची भक्ति आणि वारी सात पिढ्या चालत आलेली होती. अशा या सात्त्विक कुटुंबात रावजी आणि सौ . गीताबाई या जोडप्याचे पोटी बुधवार माघ शुद्ध द्वादशी शके १७६६ (इ.स.१९ फेब्रुवारी १८४५) या दिवशी सूर्योदयाच्या सुमारास श्रीमहाराजांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा लिंगोपंत आणि सौ. राधाबाई यांना तर अत्यानंद झाला. पाळण्यात नाव गणपति असे ठेवले. हे गौरवर्णी गुटगुटीत आनंदी बाळ साहजिकच सर्वप्रिय झाले. बाळ थोडे मोठे होताच त्याच्या अंगचे अलौकिक गुण प्रकट होऊ लागले. भगवद्भजनाची अतोनात आवड, एकपाठीपणा, तसेच अन्नदानाचे अतीव प्रेम आणि दीनदुबळ्यांचा कळवळा पाहून आजोबा धन्य झाले.




पुढे योग्य वेळी मुंज झाल्यावर गणूने उपाध्यायांकडून त्यांची सारी विद्या अगदी अल्पावधीतच आत्मसात केली. अध्यात्माची ओढ वाढतच होती, आणि अखेर नवव्या वर्षीच दोन सोबत्यांसह गणूने गुरुशोधार्थ घरातून पलायन केले . पण त्यांचा लवकरच शोध लागला आणि हा प्रयत्न विफल झाला. अकराव्या वर्षी गणूचा विवाह करण्यात आला . त्यानंतर लवकरच आजी व आजोबा दोघेही स्वर्गवासी झाले. पुढे योग्य वेळी मुंज झाल्यावर गणूने उपाध्यायांकडून त्यांची सारी विद्या अगदी अल्पावधीतच आत्मसात केली.

इकडे गुरुभेटीची तळमळ वाढतच होती. त्यांच्या ठिकाणी जन्मत:च अत्यंत तीव्र अध्यात्म वृत्ती होती. व श्री एकनाथ व श्री समर्थ यांच्याप्रमाणे अगदी लहानपणापासून आपल्या जीवित कार्याची स्पष्ट जाणीव त्यांना होती. ब्रह्मज्ञानाचे आपले ध्येय गाठण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. व अखेर, वयाच्या बाराव्या वर्षी आईला किंचितशी सूचना देऊन स्वारीने एके रात्री गुपचूप फक्त एका लंगोटीनिशी प्रयाण केले, आणि गुरुशोधार्थ भारतभ्रमण सुरु केले.

या भ्रमणात श्रीमहाराजांनी तत्कालीन बहुतेक संतांच्या भेटी घेतल्या. हरिपूर (सांगली) येथील साध्वी राधाबाई, मिरजेचे सत्पुरुष आण्णाबुवा, सटाण्याचे देव मामलेदार, अक्कलकोटचे श्रीस्वामी , हुमणाबादचे माणिक प्रभु , काशीचे तैलंगस्वामी, दक्षिणेश्वरचे श्रीरामकृष्ण परमहंस, आदि सर्वांनी अतिप्रेमाने त्यांना जवळ केले, पण 'तुझे गुरुपद माझेकडे नाही' म्हणून सांगितले. अखेर गोदातीरी श्रीसमर्थसंप्रदायी श्रीरामकृष्ण यांनी दर्शन देऊन येहळेगांवच्या श्रीतुकारामचैतन्यांकडे जाण्यास सांगितले. तेथे गेल्यावर मात्र त्यांना पूर्ण समाधान झाले. नऊ महिने तेथे त्यांनी अविरत, अविश्रांत गुरुसेवा केली. गुरूंनी खडतर कसोट्या घेऊन त्यांची देहबुद्धि पूर्णपणे नष्ट झाल्याची खात्री करून घेतली, अखेर संतुष्ट होऊन अनुग्रह केला आणि ब्रह्मचैतन्य असे नाव ठेवले. मनासारखा सद्गुरु भेटल्यावर त्याने सांगितलेल्या मार्गाने जाऊन वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी त्यांनी पूर्ण सिद्धावस्था प्राप्त करून घेतली. 'आत्मज्ञान अंगी मुरविण्यासाठी दोन वर्षे नैमिषारण्यात आत्मचिंतनासाठी जावे आणि मुख्य तीर्थक्षेत्र करून मग घरी जावे' ही गुरुआज्ञा शिरसावंद्य करून ते निघाले

श्री तुकामाईंच्या सांगण्याप्रमाणे तीर्थाटन करून ९ वर्षांनी गोंदवल्यास जाऊन घरी प्रकट झाले. सर्वांना आनंदीआनंद झाला. नऊ वर्षे आपली वाट पाहणाऱ्या पत्नीला ते माहेराहून घेऊन आले. पुढे तिच्यासह पुन: गुरुदर्शनास गेले, आणि नाशिक येथे सुमारे सहा महिने वास्तव्य करून त्यांनी तिची नामस्मरणात व ध्यानधारणेत उत्कृष्ट तयारी करून घेतली. वर्षभरानंतर तिला पुत्ररत्न झाले, पण लवकरच तो मुलगा देवाघरी गेला, आणि पाठोपाठ ती स्वत:ही वैकुंठवासी झाली. त्यानंतर काही काळाने आईच्या आग्रहाखातर त्यांनी पुन: विवाह केला, तो एका जन्मांध मुलीशी! यांना पुढे भक्तमंडळी 'आईसाहेब 'म्हणू लागली. पुढील काळात श्रीमहाराजांनी श्रीरामनामाचा प्रसार करण्याचे व सामान्य प्रापंचिकांना पेलेल असा परमार्थमार्ग दाखविण्याचे कार्य अधिकच जोराने केले. सदाचार, नामस्मरण, सगुणोपासना, अन्नदान आणि सर्वांबद्दल प्रेमभाव, यांवर त्यांचा विशेष भर होता. सन १८९० पासून श्रींचे वास्तव्य प्रामुख्याने गोंदवले येथेच राहिले. त्यांच्याकडे येणा येणाऱ्यांची व राहणाऱ्यांची संख्या खूपच वाढली. या सर्वांना सगुणोपासनेला व सेवेला एक केंद्रस्थान असावे या हेतूने त्यांनी आपल्या वाड्यातच श्रीराम, सीता व लक्ष्मण, तसेच मारुती, यांची स्थापना केली. पुढे, भक्तमंडळींची संख्या आणखी वाढत गेल्यावर त्यांनी गावातच आणखी एक राममंदिर, एक दत्तमंदिर व एक धर्मशाळा बांधून निवासाची सोय वाढवली. पुढे एक शनिमंदिरही बांधले. शिवाय, जागोजागी उपासना वाढावी या हेतूने भक्तांना प्रेरित करून अन्य कित्येक गावी राममंदिरांची स्थापना केली. श्रीमहाराजांनी इ. स. १९०१ मध्ये मातु:श्री गीताबाई व अनेक भक्तमंडळी यांसह काशीयात्रेसाठी प्रयाण केले. त्यात त्रिस्थळी झाल्यानंतर गीताबाईंनी अयोध्येत देह ठेवला. इ. स. १८७६ व १८९६ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळात श्रीमहाराजांनी आपल्या शेतावरच नाममात्र काम देऊन हजारो लोकांना अन्न पुरविले आणि उपासमारीपासून वाचविले.

ब्रह्मस्वरूपी विलीन झालेले श्रीमहाराज हे पूर्णत्वाप्रत पोहोचलेले संत होते यात शंका नाही. देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात आणि उच्चारात चुकून देखिल मी पणा व माझेपणा दिसायचा नाही, हेच त्यांच्या पूर्णत्वाचे गमक होय. अर्थात स्वत:बद्दल काहीच करायचे न उरल्यामुळे केवळ जगाचे कल्याण व्हावे एवढीच त्यांची भावना होती. आपण जो ब्रह्मानंद सेवन करतो तो सर्वांनी सेवावा व धन्य होऊन जावे या एकाच प्रेरणेने प्रभावित होऊन सर्व प्रकारच्या लोकांना त्यांनी जवळ केले. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे त्यांचे चरित्र! प्रापंचिकाच्या प्रत्येक आध्यात्मिक शंकेचे उत्तर त्यांच्या चरित्रात सापडते. प्रापंचिक लोकांसाठी हा खटाटोप करीत असताना त्यांना अकारण निंदा, अपमान, छळ व कमीपणा सोसावा




लागला. तरी देखील सर्वांनी भगवंताच्या मार्गी लागावे म्हणजे भगवंताचे नाम घ्यावे म्हणून शेवटचा श्वास असेतोपर्यंत त्यांनी प्रयत्न केला आणि केवळ जनहितार्थ आपले आयुष्य वेचून आणि सर्वस्व देवून असंख्य लोकांना भगवंताच्या नामाचा व प्रेमाचा महिमा पटवून दिला.

भगवंताच्या नामाची थोरवी गाता गाता श्रीमहाराजांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण गेला. नामाचे महत्त्व सांगण्यासाठी ते जन्माला आले, नामाच्या महत्त्वाचे त्यांनी जन्मभर गायन केले. आणि आपल्या आयुष्याचे शेवटचे क्षण नामाचे महत्त्व सांगण्यातच त्यांनी घालविले. श्रीमहाराजांनी जन्मभर डोळ्यांनी नाम पाहिले, कानांनी नाम ऐकले, वाणीने नाम घेतले, मनाने नाम कल्पिले, बुद्धीने नाम चिंतिले, काया वाचा मनाने जगात एका नामाशिवाय त्यांनी दुसरे काहीच सत्य मानले नाही.

सोमवार, मार्गशीर्ष कृष्ण दशमी शके १८३५, (इ.स.२२ डिसेंबर १९१३) या दिवशी, पहाटे ५.५५ वाजता 'जेथें नाम, तेथें माझे प्राण, ही सांभाळावी खूण.' हे शेवटचे शब्द उच्चारून, या महापुरुषाने आपला देह ठेवला. जगाला प्रकाश देणारा भौतिक सूर्य पूर्वेकडे वर येऊ पहात असताना गोंदवल्याचा हा अध्यात्मसूर्य मावळला. भारतीय ऋषींची परंपरा चालविणारा हा महापुरुष अनंतामध्ये विलीन झाला.

गोंदवलेकर महाराजांनी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे तो म्हणजे- तुम्ही भगवंताशी नाते जोडा, मग भगवंत म्हणजे स्वामी आपण सेवक, भगवंत माता आपण लेकरू, भगवंत पिता आपण पुत्र आणि त्याप्रमाणे मग भगवंता विषयीचे प्रेम वाढीस लागते. आपण मुलाला दत्तक घेतल्यानंतर पुत्रप्रेम वाढीस लागते. कोण नवरा आणि कोणती बायको माहिती नसते पण लग्नानंतर प्रेम वाढते. तसेच भगवंता विषयी आपण असे नाते निर्माण करून प्रेम वाढीस लावू शकतो.

जेथे राम नाम तेथे मी आहे. तुम्ही रामनामाला घट्ट धरून ठेवा मी तुमच्या जवळपासच आहे असे ते सांगून गेलेत. वर्षभरात अनेक उत्सव गोंदवले नगरीत साजरी होत असतात आपणही श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या मठात जाऊन दर्शन घेऊ शकता. दोन दिवस निवासाची सोय त्या ठिकाणी मोफत आहे तसेच महाप्रसादाचा लाभ होतो.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस समाधान सुख शोधत आहे. अशावेळी दोन दिवस का होईना महाराजाचे मठात जाऊन अखंड नामजपात तल्लीन होऊन आत्म समाधान मिळवावे.

***

# माझ्या आजीचा जीवन संघर्ष

ज्योतिर्मय साहित्य

मी लहानपणापासून माझ्या आजीच्या कुशीत वाढलो, घडलो व लहानाचा मोठा होत गेलो. माझ्या आजीने सुद्धा माझ्यावर खूप जीव लावला. माझी आजी सुमनबाई व्यंकटी कांबळे चारित्र्याची व मायेची खान आहे. तिचा जीवन संघर्ष भल्याभल्यांना थक्क करणारा आहे. तिचे लग्न अतिशय कमी वयात झाले. माझ्या आजीचे लग्न झाल्यावर काही दिवसांनी माझे पणजोबा म्हणजेच माझ्या आजीचे सासरे बापूराव कांबळे यांनी माझ्या आजीला बाजूला टाकले. माझ्या आजीला चार अपत्य झाली. माझे वडील चंद्रकांत व्यंकटी कांबळे हे सर्वात मोठे व वडील बंधू आहेत. नंतर माझे चुलते सुरेश व्यंकटी कांबळे, नंदकुमार व्यंकटी कांबळे व प्रकाश व्यंकटी कांबळे असे एकानंतर एक मिळून चार जणांचा जन्म झाला. माझे आजोबा व्यंकटी कांबळे यांचे पहिले लग्न आत्याच्या मुलीशी म्हणजेच कस्तुरबाशी झाले. माझ्या आजोबाच्या पहिल्या पत्नीला एक मुलगी झाली किरण तिचे नाव ठेवले. कस्तुरबा वागायला व बोलायला अतिशय कडक स्वभावाची होती. ती माझ्या आजोबांना नीट बोलायची नाही. ती आपल्या पतीला आदराने अहो न बोलता, आपल्या पतीचा सन्मान न करता ती माझ्या आजोबांना ओंगळ व उद्धट भाषेत बोलायची. माझे आजोबा व्यंकटी कांबळे हे फार स्वाभिमानी व एक वचनी होते. त्यांना आपल्या पत्नीने अरे तुरे बोललेले त्यांना खटकत होते. त्यांना पत्नीने असभ्य भाषेत बोललेले चालायचे नाही. म्हणून माझे आजोबा त्यांच्या पत्नीला म्हणजेच कस्तुरबाला मला असे का बोलतेस? म्हणून जाब विचारायचे, मी तुझा पती आहे, तू मला असभ्य भाषेत का बोलतेस? चार माणसात अरे तुरे बोलून माझी मानहानी का करतेस? पत्नीने पतीला कसे बोलायचे असते याचे भान तुला आहे का? असे एक ना अनेक प्रश्न विचारून माझे आजोबा कस्तुरबा या पहिल्या पत्नीला चांगलेच झापायचे. खरे तर कस्तुरबा अतिशय लाडात वाढलेली आई-वडिलांची लाडकी मुलगी होती. तिला वाटायचे की पतीने माझ्या धाकात राहावे, माझ्या शब्दाच्या पुढे जाऊ नये. मी जे काम सांगितले ते मुकाट्याने करावे. घरातील कारभार माझ्याकडेच सोपवावा. असे कस्तुरबाला मनोमन वाटायचे. परंतु माझे आजोबा अतिशय शिस्तप्रिय व स्वाभिमानी होते. त्यांना तिरसट वागलेले जराही पटायचे नाही. पत्नीने पत्नी सारखेच राहावे आणि पतीचा सन्मान करावा. पतीला वेळेवर जेवण द्यावे, पतीचे कपडे धुवावेत, घरातील कामे वेळेवर व मन लावून करावीत आणि पतीसोबत प्रेमाने राहून संसार यशस्वी करावा. पतीची खूप खूप सेवा करावी. असे माझ्या आजोबांना नेहमी वाटायचे. दोघांच्या अशा विरुद्ध वागण्यामुळे दोघांत असणारी मतभेदाची दरी खोल होत गेली. त्या दोघांचे जराही चांगले जमायचे नाही. कस्तुरबा माझ्या आजोबांना असभ्य व उद्धट भाषेत बोलून त्याचा घोर अपमान करायची. माझ्या आजोबांना नेमके हेच पटत नव्हते. दोघांच्या विचारांत मत भिन्नता असल्यामुळे ते दोघेपण एकमेकांच्या विरुद्ध वागायचे. परंतु माझे आजोबा सत्याच्या बाजूने चालायचे. कस्तुरबा देखील माझ्यासोबत माणुसकीने व प्रेमाने राहावी, असे माझ्या आजोबांना नेहमी वाटायचे. यातूनच रोज भांडण तंटे व्हायचे. कस्तुरबा माझ्या आजोबांना एकदम नीच व हीन दर्जाची असभ्य भाषा बोलायची. ती माझ्या आजोबांचे कपडे देखील धुवत नव्हती. माझ्या आजोबांना प्रेमाने जेवण वाढायची नाही. सारखा माझ्या आजोबांचा अपमान करायची. परंतु माझे आजोबा व्यंकटी कांबळे हे फार स्वाभिमानी, चारित्र्यवान व निष्कलंक होते. ती नीट सुधारावी आणि तिने पतीचा आदरपूर्वक सन्मान करावा असे माझ्या आजोबांना मनोमन वाटायचे.

आजोबा तिला खूप चांगुलपणा शिकवायचा प्रयत्न करायचे. तिला वठणीवर आणण्याचे धाडस करायचे तरी सुद्धा ती काही सुधारायचे नाव घेत नव्हती. शेवटी आजोबांनी कस्तुरबाला एक मुलगी झाल्याच्या नंतर तिला सोडून दिले. कारण माझ्या आजोबांना तिचे बोलणे, वागणे व एकंदरीतच तिचे राहणीमान आवडत नसल्यामुळे आजोबांनी घटस्फोट घेण्याचे ठरवले. कस्तुरबा ने माझ्या आजोबांच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये जाऊन केस केली. आणि मला एक मुलगी आहे, तिला मी कसे जगवू? मला माझ्या मुलीसाठी शेत हवे आहे, म्हणून तिने कोर्टात असा बयान दिला. तेव्हा तिला दोन एकर जमीन द्यावी लागली. आजोबांना खूप वेळा जेलमध्ये जाऊन जेलची हवा खावी लागली. इकडे माझ्या आजोबाची दुसरी पत्नी म्हणजे माझी आजी सुमनबाई व्यंकटी कांबळे हिला इकडे चार अपत्य झाली. अपत्य प्राप्तीनंतर माझ्या आजी-आजोबांना बाजूला टाकण्यात आले. तेव्हा माझ्या आजीचा सुमनबाईचा जीवन संघर्ष सुरू झाला. माझे आजोबा व्यंकटी कांबळे जेलमध्ये असताना माझी आजी सुमनबाई नेटाने संसार करायची. तिला सासू-सासऱ्याचा आधार नव्हता ना भावकीचा आधार नव्हता. ती लोकांच्या शेतात काबाडकष्ट करून व बराशीचे खोदकाम करून आपले चार अपत्य जगवायची. मुलांना लहानाचे मोठे करून माझ्या आजीने चारही मुलांना शाळेत घातले, त्यांच्या शिक्षणाचा सर्व खर्च माझी आजी सुमनबाई सारायची. पतीच्या गैरहजेरीत माझ्या आजीने केलेला संसार हा भल्याभल्यांना थक्क करतो. माझ्या आजोबांना आठ दिवसाला पोलीस येऊन पकडून न्यायचे. तेव्हा माझ्या आजीच्या जीवावर संसाराचा डोलारा उभा राहायचा. माझी आजी स्वतः दुसऱ्याच्या शेतात काबाडकष्ट करून दाळदाना गोळा करायची. एका बाईच्या जीवावर चार लेकरांचा सांभाळ आणि सावत्र सासूच्या हाताखाली संसार करणे हे काय साधे काम नव्हते. माझी आजी सुमनबाई पती जेलमध्ये असताना स्वाभिमानाने संसार करायची. घरात पैसे नसतील तर आजी उपाशी राहायची पण कोणाकडे शरण जात नव्हती. इतकी स्वाभिमानी माझी आजी चारित्र्याची व मायेची खान होती. माझी आजी काबाडकष्ट करून चार मुलांना जगवायची पण कोणाकडे एक रुपयाची देखील भिक मागायची नाही. उलट गरजू लोकांना सढळ हाताने मदत करायची. ती दुसऱ्याच्या शेतात रोजगार करत असल्यामुळे तिला भावकीतील अनेक जण नावे ठेवायचे. एकदा माझ्या आजीच्या सासू-सासऱ्याने माझ्या आजीला घराबाहेर काढले होते तेव्हा माझी आजी चार मुलांना घेऊन पायी चालत तिच्या माहेरी खांबेगाव या गावी गेली होती. तेव्हा दळणवळण व्यवस्था नव्हती. ज्यांनी ज्यांनी माझ्या आजीला नावे ठेवली तीच माणसे पुन्हा माझ्या आजीकडे पैशासाठी भीक मागत होते. चारही मुलांना लहानाचे मोठे केले, त्यांना शिक्षण शिकवले आणि योग्य संस्काराची रुजवून करून माझ्या आजीने चारही मुलांना सुसंस्कारी व चारित्र्यसंपन्न बनवले. चारही मुले सुसंस्कारी व गुणी निपजल्यामुळे माझ्या घरात कोणताच भाऊ कोणत्याच भावाबद्दल अपशब्द बोलत नाही. सारे भाऊ एकत्र कुटुंब पद्धतीचा अवलंब करतात. घरासाठी वाद नाही की शेतीसाठी वाद नाही. सारे भाऊ एकमेकांना मिळून मिसळून संकटात व सुखदु:खात धावून येतात. कुणाला आर्थिक अडचण पडली तर वाऱ्याच्या वेगाने धावून येतात आणि फुल नाही पण फुलाची पाकळी का होईना आपल्या भावाला मदत करतात. या चार भावंडांमध्ये भांडण झालेले मी कधी पाहिले नाही. आणि या चारही भावांनी आई-वडिलांना अपमान होईल असे शब्द कधी वापरले नाहीत. कधी चोरी, लबाडी केली नाही आणि परस्त्रीकडे वाईट नजरेने कधी पाहिले नाही. चारही भाऊ एकमेकांना जीवापाड जपतात. सुखदुः खात खंबीरपणे साथ देतात. म्हणून गावात चार भावांच्या चांगुलपणाचे नेहमी नाव काढले जाते. कारण माझ्या आजीने तिच्या चारही मुलांवर संस्काराची तशी रुजवनच केली आहे. म्हणून चारही मुले चारित्र्यवान व शीलवान निपजली आहेत. दुर्दैवाने आज माझे आजोबा आमच्यात जिवंत नाहीत परंतु माझे आजोबा व्यंकटी कांबळे आणि माझी आजी सुमनबाई या दोघांचे प्रेम म्हणजे लैला मजनू सारखे होते. या दोघांनी जो संसाराचा गाडा ओढला तो अतिशय दलदलीतून आणि खाच खळग्यातून बाहेर काढून चांगल्या मार्गावर आणला. या दोघांचे प्रेम कोणत्याही प्रियकर प्रेयसीला लाजवेल असे होते. या दोघात भांडण तंटे झाल्याचे मी कधी पाहिले नाही. दोघेही सोबत जेवायचे, एकमेकांना समजून घेऊन एकमेकांवर जीव ओवाळून टाकायचे. आजी चारित्र्याची खाण होती तर आजोबा सुविचारांचा महासागर होते. माझी आई कृष्णमाला चंद्रकांत कांबळे ही सुद्धा माझ्या आजीच्या हाताखाली संसार करून स्वाभिमानाने व जिद्दीने काबाडकष्ट करून संसाराचा गाडा नेटाने ओढत असते. माझ्या आईला अनेक आजारांनी घेरले आहे. तिला मरेपर्यंत डॉक्टरांनी गोळ्या खाण्यास सांगितले आहे. तरीसुद्धा माझी आई शेतात काबाडकष्ट करून घर प्रपंच चालवत असते. कापूस वेचणीला माझ्या आईचा हात कोणीच धरू शकत नाही. माझी आई शंभर किलो कापूस वेचते. एवढी आजारी असून सुद्धा माझी आई काबाडकष्ट करायला सर्वात पुढे असते. माझ्या आईला आमच्या घरात सर्वजण मान देतात. ती सुद्धा सगळ्यांची जीवापाड काळजी घेते. चारित्र्याला व शिलाला खूप खूप जपते. माझी आजी व माझे आजोबा माझ्या आईला जीवापाड जपायचे, तिला खूप खूप जीव लावून तिच्या कामाचे कौतुक करायचे. माझी आई माझ्या आजीच्या शब्दाच्या पुढे कधी गेली नाही. आजीच्या संस्काराच्या छायेखाली माझी आई वाढल्यामुळे माझ्या आईला कोणीच नाव ठेवत नाही. माझी आई




बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

बोलायला व वागायला चांगली असल्यामुळे माझ्या आईचे नाव गावातील लोक आदराने काढतात. आजीच्या संस्काराच्या छायेखाली माझी आई वाढली व मी सुद्धा वाढलो, हे मला आवर्जून या ठिकाणी सांगावे वाटते. मी लहानपणापासून आजीच्या सहवासात राहिलो व आजीला सोडून मी कधीच कुठे गेलो नाही आणि आजी देखील मला सोडून कुठे गेली नाही. आजीने माझ्यावर संस्काराची छाप अशी पाडली आहे की, मी अजूनही कोण्या मुलीकडे वा महिलेकडे वाईट दृष्टिकोनातून पाहिले नाही. शालेय व कॉलेज जीवनात माझ्यामागे अनेक मुली होत्या पण मी त्यांना बहीण मानून सोडून दिले. हे केवळ माझ्या आजीच्या संस्कारामुळेच माझ्यात चांगल्या गुणांची पेरणी झाली आहे. आजघडीला माझ्या आजीचे वय जवळपास ७५ च्या आसपास आहे. तरीसुद्धा माझी आजी अतिशय कणखर व मजबूत आहे. तिचा आतापर्यंत एकही दात पडला नाही. ती आजही शेतात काबाडकष्ट करण्यात जवान बाईला मागे पाडते. तिच्या कार्याला व तिच्या संस्काराला माझा साष्टांग दंडवत...माझी आजी खरोखरच एक संघर्ष योद्धा होती....तिचा संघर्ष खूप मोठा व कोणालाही अचंबीत करणारा आहे. माझ्या आजीच्या संस्कार कथांनी मी घडलो, माझी आई घडली, माझे वडील घडले आणि माझे तीन चुलते सुद्धा घडले. माझी बहीण अंजली वैभव रोडे ही दहावीला ९२ टक्के गुण घेऊन वर्गात द्वितीय आली होती. ती अतिशय सुसंस्कारी व वागायला निर्मळ मनाची व चांगल्या गुणांची होती. चालताना नाकाकडे बघून सरळ चालणारी माझी बहीण चारित्र्याची व शिलाची खाण होती. कारण माझी आजी सुमनबाई व्यंकटी कांबळे हजारात नाही तर लाखात एक होती. तिच्या संस्काराच्या पेरणीमुळे आम्ही सगळे घडलो. तिच्या प्रेरणादायी संघर्षाला माझा मनःपूर्वक सलाम.. माझ्या आजीला उदंड आयुष्य लाभो हीच नम्र प्रार्थना करतो..आणि आजीचा जीवन संघर्ष खरोखरच इतरांसाठी प्रेरणादायी आहे. म्हणून हल्लीच्या मुलींनी माझ्या आजीची प्रेरणा घ्यावी व आपल्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणावा हेच जाता जाता सांगावे वाटते...

माझी आजी चारित्र्याची खान...
होता तिला समाजात खूप मान...
संसार केला तिने अतिशय नेटाने..
जसा केला भिमाच्या रमाईने...

****

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559